सिंचनात् राष्ट्रोद्धार :

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,
# पुणे-४११ ०११

## नियामक मंडळाची १०६ वी बैठक
## दिनांक १ जून २०२१

# ठराव

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची १०६ वी बैठक दिनांक १ जून २०२१
## ठराव

मा. ना. श्री. जयंत राजाराम पाटील, मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची १०६ वी बैठक मंगळवार दिनांक ०१/०६/२०२१ रोजी परिषद सभागृह क्र. ३, सातवा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. जयंत राजाराम पाटील | ... | मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास व अध्यक्ष |
| २. | मा. ना. श्री. ओमप्रकाश ऊर्फ बच्चू बाबाराव कडू | | राज्यमंत्री, जलसंपदा व विशेष निमंत्रित (V.C.द्वारे) |
| ३. | मा. श्री. देबाशिष चक्रवर्ती | ... | अपर मुख्य सचिव (नियोजन) व सदस्य |
| ४. | मा. श्री. संजय घाणेकर | ... | सचिव (जसंव्य व लाक्षेवि) व सदस्य |
| ५. | मा. श्री. ता. ना. मुंडे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. विवेक दहिफळे | ... | सहसचिव<br>मा.अप्पर मुख्य सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी |
| २. | श्री. सिद्धार्थ चौरे | | कक्ष अधिकारी<br>सचिव (कृषि) व सदस्य यांचे प्रतिनिधी |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. ता. ना. मुंडे | ... | सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मुंबई |
| २. | श्री. विलास गि. राजपूत | ... | मुख्य अभियंता (विप्र), जलसंपदा विभाग, पुणे |
| ३. | श्री. ह. वि. गुणाले | ... | मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे |
| ३. | श्री. संजय अनपट | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी,मकृखोविम, पुणे |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची १०६ वी बैठक दिनांक १ जून २०२१

# ठराव

ठराव क्र. १०६/०१

"ठराव करण्यात येतो की, दि. ०३.०७.२०२० रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या १०४ व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावावर करण्यात आलेल्या कार्यवाही अहवालाचे नियामक मंडळाने अवलोकन केले आहे."

ठराव क्र. १०६/०२

"ठराव करण्यात येतो की, दि. २९/१२/२०२० रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या १०५ व्या बैठकीत पारित करण्यात आलेल्या ठरावापैकी ठराव क्र. १०५/०२ बाबत ठराव पारित झालेला नसल्याने सदर ठराव वगळता उर्वरित ठराव क्र. १०५/१ व १०५/३ ते १०५/२४ कायम करण्यात आले."

ठराव क्र. १०६/३

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा सन २०१९-२० या वर्षाच्या ताळेबंद व प्रकल्प प्रगती लेख्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.१०६/४

"ठराव करण्यात येतो की,जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. देवदु. २०१५/ (८३६/२०१५)/ सिं.व्य. (कामे), दि. १७-११-२०१६ नुसार दि. १५ ऑक्टोबर २०२० चा पाणीसाठा विचारात घेऊन सिंचन व्यवस्थापनाचे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील जमा व खर्चाचे रु. ३९०००.०० लक्षचे अंदाजपत्रक अंतिम करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०६/५

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या मुदत ठेवीवर योग्य व्याज रुपाने महसूल प्राप्त होणेसाठी राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेव ठेवण्यासाठी नियामक मंडळाच्या दि. २०/०६/२०१६ रोजीच्या ९२ व्या बैठकीतील ठराव क्र. ९२/६ नुसार बैठकीत

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११**

**नियामक मंडळाची १०६ वी बैठक दिनांक १ जून २०२१**

निश्चित केलेली रु. १०० कोटी रकमेची मर्यादा वाढविण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०६/६

"ठराव करण्यात येतो की, मे. सुभाष सामुदायीक शेतकी संघ लि.मांजरी बु. ता. हवेली, जि. पुणे या संस्थेकडे भाडेपट्टा कराराने असलेल्या १५४ एकर शासकीय जमिनीस सदर संस्थेच्या मूळ भाडेपट्टा (Lease) करारनाम्यातील बाबींची तपासणी करुन सदर संस्थेस दि. ३१/०३/२०१५ नंतर १५ वर्षासाठी मुदतवाढ देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०६/७

"ठराव करण्यात येतो की, नवीन मुठा उजवा कालव्याच्या कडेची अंदाजे ३०० मी X ३० मी. मोकळी जागा वृक्षारोपण व देखभाल करुन क्षेत्र पर्यावरणापूरक ठेवण्यासाठी विंटेज विस्टा सहकारी गृहरचना संस्था मर्यादीत, मांजरी बु.,ता. हवेली, जि. पुणे या संस्थेच्या उद्देशाची खातरजमा करुन महामंडळाच्या सदर जागेचे संवर्धन करण्याच्यादृष्टीने खालील नमूद अटी व शर्ती अधीन देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"

अटी व शर्ती :

(१) सदरच्या जागेवर विंटेज विस्टा, पुणे यांना वृक्षारोपण व संरक्षक भिंत बांधणे कामा व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

(२) मागणी केलेल्या जागेचा वापर प्रस्तावात नमूद केलेल्या कारणास्तव करावा अन्य कारणासाठी म्हणजेच सार्वजनिक वहिवाटीसाठी वा इतर खाजगी प्रयोजनासाठी सदर जागा वापर विंटेज विस्टा, पुणे यांना करता येणार नाही.

(३) नवीन मुठा उजव्या कालव्या लगतचे जागेवर अतिक्रमण होणार नाही याची जबाबदारी विंटेज विस्टा, पुणे यांचेवर राहिल. तसेच सदरची जागा संरक्षित करणेच्या दृष्टीने लोखंडी खांब,तार, कुंपण तसेच संरक्षक भिंत या बाबी त्यांना स्वखर्चाने कराव्या लागतील.

(४) सदर मागणी केलेली जागा इतर कोणालाही हस्तांतरीत करता येणार नाही व जलसंपदा विभागास सदरची जागा गरज लागल्यास परत करणे बंधनकारक राहील.

(५) सदर जागेची मालकी जलसंपदा विभाग / महाराष्ट्र शासन यांची असून वृक्षारोपण विंटेज विस्टा, पुणे यांचे सौजन्याने करण्यात आली आहे अशा आशयाचा बोर्ड जागेवर लावावा.

(६) उपरोक्त नमूद सर्व बाबीबाबत संस्थेचे Undertaking घेण्यात यावे.

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची १०६ वी बैठक दिनांक १ जून २०२१

ठराव क्र.१०६/८

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाचे मालकीची हडपसर हद्दीतील जुना मुठा उजव्या कालव्या लगतचे सर्व्हे नं. २०३,२०४, २०६ मधील ५५ आर मोकळी जागा वृक्षारोपण व देखभाल करणेसाठी सदर संस्थेच्या उद्देशाची खातरजमा करुन महामंडळाच्या सदर जागेचे संवर्धन करण्याच्यादृष्टीने खालील नमूद अटी व शर्ती अधीन देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

अटी व शर्ती :

१. सदरच्या जागेची शासन नियमानुसार चालु वर्षीच्या मुल्यांकनानुसार/बाजार भावाप्रमाणे होणारी रक्कम सिरम इन्स्टीट्यूट प्रा. लि. हडपसर, पुणे यांनी भरणे बंधनकारक आहे.

२. सदरच्या जागेवर सिरम इन्स्टीट्यूट प्रा. लि. हडपसर, पुणे यांना वृक्षारोपण व देखभाल करणेच्या कामा व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

३. मागणी केलेल्या जागेचा वापर प्रस्तावात नमूद केलेल्या कारणास्तव करावा अन्य कारणासाठी म्हणजेच सार्वजनिक वहिवाटीसाठी वा इतर खाजगी प्रयोजनासाठी सदर जागा वापर सिरम इन्स्टीट्युट प्रा. पुणे ,हडपसर.लि. यांना करता येणार नाही.

४. जुना मुठा उजव्या कालव्या लगतचे सर्व्हे नं. २०३,२०४, २०६ मधील ५५ आर मोकळया जागेवर अतिक्रमण होणार नाही याची जबाबदारी सिरम इन्स्टीट्यूट प्रा. लि. हडपसर, पुणे यांचेवर राहील. तसेच सदरची जागा संरक्षित करणेच्या दृष्टीने लोखंडी खांब,तार, कुंपन तसेच संरक्षक भिंत या बाबी त्यांना स्वखर्चाने कराव्या लागतील.

५. सदरची मागणी जागा इतर कोणालाही हस्तांतरीत करता येणार नाही व जलसंपदा विभागास सदरची जागा गरज लागल्यास परत करणे बंधनकारक राहील.

६. सदर जागेची मालकी जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांची असून वृक्षारोपण सिरम इन्स्टीट्यूट प्रा. लि. हडपसर, पुणे यांचे सौजन्याने करण्यात आली आहे अशा आशयाचा बोर्ड जागेवर लावावा.

७. उपरोक्त नमूद सर्व बाबीबाबत संस्थेचे Undertaking घेण्यात यावे.

ठराव क्र. १०६/९

"ठराव करण्यात येतो की, रहिमतपुर नगरपरिषद ता.कोरेगाव जि.सातारा यांनी मागणी केलेले सर्वे नं २३२ क्षेत्र ३ हेक्टर ४० आर पैकी नगरपरिषद आरक्षण क्र.९४ बहुउद्देशिय सभागृहासाठी आरक्षित असलेले क्षेत्र १ हे.११ आर (११,१०० चौमी) व या आरक्षणाचे उपरोक्त असणारे ०.७७ हे (७७०० चौमी) क्षेत्र असे एकुण १.८८ हेक्टर (१८,८००चौमी) क्षेत्र फेरमुल्यांकनानुसार रु. २,१०,५६,०००/- इतक्या रकमेस हस्तातंरीत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची १०६ वी बैठक दिनांक १ जून २०२१

ठराव क्र. १०६/१०

"ठराव करण्यात येतो की, सर्व्हे नं ११३८/३ मधील कुकडी वसाहतील इमारती ६४६.८६ चौ.मी. व मोकळी जागा ७४०.२५ चौ.मी. मे.जिल्हा न्यायालय, पुणे यांना नाममात्र भाडयाने देणेकरीता कुकडी वसाहतीतील इमारती दुरुस्ती न्यायदान विभागामार्फत सार्वजनिक बांधकाम विभाग करणार आहे. जलसंपदा विभागाकडील / महामंडळाच्या ताब्यातील मिळकत सर्व्हे नं ११३८/३ मधील संपादीत क्षेत्रातील १४९२५.०० चौ.फु (१३८७.११ चौ.मी) इमारतीसह मोकळी जागा मे.जिल्हा न्यायालय,पुणे यांना सद्य:स्थितीत ११ महिन्यांच्या करारावर तसेच इतर अनुषंगिक होणारा खर्च (भाडेपट्टा कालावधीत) व नुतनीकरण न्याय विभागाने करणे तसेच सदर नूतनीकरण करताना बसविण्यात येणारी उपकरणे (वातानुकुलित यंत्रणा, पंखे, दिवे इ.) करारनामा संपल्यानंतर परत काढून न घेण्याच्या अटीअधीन नाममात्र दराने भाडेतत्वावर देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०६/११

"ठराव करण्यात येतो की, भामा आसखेड धरणाजवळ मौजे वाकी तर्फे वाडा येथील गट क्र. २३,२५,२८ व ३६ मधील जलसंपदा विभागाने संपादित केलेल्या जमिनीतील १.२० हे. जागा २०० द.ल.लि. प्रती दिनी क्षमतेचे अशुध्द जल उपसा करणेकरिता जॅकवेल, ॲप्रोच ब्रिज व सबस्टेशन इ. बांधकामाकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांना भाडेतत्वावर देण्याचा प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

अटी :

(१) सदरच्या जागेसाठी शासन नियमानुसार निश्चित केलेली भाडेपट्टा रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ यांनी भरणे बंधनकारक आहे.

(२) सदरच्या जागेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ यांना विहिर, पंपहाऊस, व ॲप्रोच ब्रीज व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

(३) मागणी केलेल्या जागेचा वापर प्रस्तावात नमूद केलेल्या कारणास्तव करावा अन्य कारणासाठी जागा वापर करता येणार नाही.

(४) मागणी केलेल्या जागेवर महामंडळाचा हक्क अबाधित राहील शिवाय करारनामा कोणतेही कारण न देता समाप्त करण्याचा हक्क राखून ठेवावा.

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची १०६ वी बैठक दिनांक १ जून २०२१

ठराव क्र. १०६/१२

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाकडील प्रकल्पांच्या निविदांतर्गत निर्माण होणाऱ्या सांगोला शाखा कालवा प्रकल्पाच्या निविदेवरील रु. ७५.६२ लक्ष चे दायित्वास शासन निर्णय निविदा १२१३/(७३५/१२)/मोप्र-१, दि.२२-१२-२०१७ नुसार नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०६/१३

"सन २०२०-२१ च्या वार्षिक आखणीनुसार निश्चित केलेले उद्दिष्ट व साध्य याचे नियामक मंडळाने अवलोकन केले."

ठराव क्र. १०६/१४

"सन २०२१-२२ च्या वार्षिक आखणीनुसार निश्चित केलेले उद्दिष्ट व प्रकल्प पूर्ण करावयाच्या नियोजनाचे नियामक मंडळाने अवलोकन केले."

ठराव क्र. १०६/१५

"ठराव करण्यात येतो की, जलसंपदा विभागाचे मालकीची मुठा डावा कालव्यासाठी संपादन केलेली फर्ग्युसन महाविद्यालयाच्या परिसरातील पेठ भांबुर्डा येथील फायनल प्लॉट नं. ३०५ व ३०४ पैकी लगत खडकवासला कालवा क्षेत्र ०.३० हेक्टर जमीन सारथी, पुणे या संस्थेस कायमस्वरुपी उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने सदर जमीन / जागेचे चालू बाजार मुल्य कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांचेकडून महामंडळास प्राप्त झाले नंतर सदरची ०.३० हे. संपादित जमीन जिल्हाधिकारी, पुणे मार्फत सारथी संस्थेस कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे"

ठराव क्र. १०६/१६

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाचे मालकीची मौजे रांझणी (भीमानगर) ग्रामपंचायत ता.माढा. जि.सोलापूर येथील राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत पाणी पुरवठा योजनेसाठी विहिर व पंपहाऊससाठी रांझणी हद्दीतील गट क्र. ७०/१ मधील २ गुंठे जागा शासकीय दरानुसार (रेडी रेकनर) ३० वर्षे कालावधीसाठी १० % चक्रिय वाढ धरुन भाडे तत्वावर दिलेल्या जागेस नियामक मंडळाचे बैठकीतील ठराव क्र. १००/१० दिनांक १२-०६-२०१९ अन्वये झालेल्या निर्णयानुसार प्राप्त प्रस्तावास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची १०६ वी बैठक दिनांक १ जून २०२१

ठराव क्र. १०६/१७

"ठराव करण्यात येतो की, उपरोक्त मुद्दे विचारात घेता वारणा प्रकल्प अंतर्गत वारणा डावा तीर कालवा कि.मी. २७ ते ४३ (किमी ३५व ३९ वगळून) व वारणा डावा तीर कालवा कि.मी ५४ ते ६२ मधील उर्वरीत मातीकाम, बांधकामे, जिओसिंथेटीक साहित्याचा वापर करुन गळती प्रतिबंधक उपाय योजना करणे, पेव्हर फिनिशरने कालवा अस्तरीकरण व इतर अनुषंगीक काम पुर्ण करणेसाठी मूळ कंत्राटदार मे.महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन कार्पोरेशन ॲन्ड इंदू (संयुक्त अभियान) यांनी विनंती केलेनुसार मे. शिवशक्ती कन्स्ट्रक्शन कंपनी, सांगली हे उपठेकेदार नेमून निविदेतील उर्वरित कामे उपठेकेदाराकडे Sublet करणेच्या प्रस्तावास तसेच इतर प्रकल्पांच्याबाबत प्रकल्प पूर्ण करणेच्यादृष्टीने आवश्यक कामांच्या Sublet प्रस्तावास महामंडळाच्या मान्यतेने मुख्य अभियंतास्तरावर कार्यवाही करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०६/१८

"ठराव करण्यात येतो की, उजनी जलाशयामध्ये पिंजरा पद्धतीने मत्स्य संवर्धन करणेसाठी कृषी व पदुम शासन निर्णय दि.१७/१०/२०१६ ला अनुसरुन उजनी जलाशयातील मौजे गंगावळण, ता. इंदापूर, जि. पुणे येथील संपादित गट नं. ४९/४ मध्ये ७५० चौ.मी. क्षेत्रामध्ये रु. २ लक्ष इतक्या रकमेस ३ वर्षाच्या कालावधीसाठी पिंजरा पद्धतीने मत्स्य संवर्धन प्रकल्प राबविण्यास खालील नमूद अटी व शर्ती अधीन "खास बाब" म्हणून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

१. सदर प्रकल्प राबविणाऱ्या ठेकेदारास जलसंपदा विभागाने वेळोवेळी घेतलेले निर्णय बंधनकारक राहतील.

२. धरण सुरक्षिततेच्यादृष्टीने सदर प्रकल्प धरणाच्या प्रतिबंधित क्षेत्रात राबविण्यात येऊ नये.

३. सदर प्रकल्पाच्या आराखड्याची क्षेत्रीय स्तरावर खातरजमा करुन प्रकल्प राबविण्याबाबत कार्यवाही करावी.

ठराव क्र. १०६/१९

"ठराव करण्यात येतो की, पुणे पाटबंधारे मंडळांतर्गत पुणे पाटबंधारे विभाग, पुणे व चासकमान पाटबंधारे विभाग, पुणे या विभागांचे कार्यक्षेत्रातील सिंचन प्रकल्पांचा जमा सिंचन पुनर्स्थापना निधीमधून सदर विभागाकडील प्रकल्पनिहाय आवश्यक कामांकरिता रक्कम राखीव ठेवून उर्वरीत निधी, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे व निरा उजवा कालवा विभाग, फलटण या विभागांकडील अनुक्रमे नवीन मुठा उजवा कालवा व निरा उजवा कालव्याचे मजबुतीकरण कामासाठी वर्ग करण्यास व महामंडळाकडे सिंचन कपातीपोटी जमा झालेल्या पुणे पाटबंधारे

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची १०६ वी बैठक दिनांक १ जून २०२१

मंडळांतर्गत प्रकल्पांची शिल्लक रू.११२.१६ कोटी पुनर्स्थापना रक्कमेमधून मंडळांतर्गत प्रकल्पांच्या (यादी-अ नुसार) आवश्यक दुरूस्ती कामांकरिता खर्च करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०६/२०

"ठराव करण्यात येतो की, हडपसर वसाहतीमधील सर्व्हे क्र. १५२ अ/१ई मधील ९ गुंठे जागा सावित्रीबाई बहुउद्देशिय सामाजिक या खाजगी संस्थेस देण्यात आलेली जागा महामंडळाच्या ताब्यात घेण्यात यावी व संस्थेची थकित भाडेपट्टा रक्कम वसूल करण्यात यावी. सदर जागा महामंडळाची परवानगी न घेता संस्थेस भाडेपट्टयाने देण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियमान्वये कार्यवाही करण्यात यावी."

ठराव क्र. १६०/२१

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळाचे कायदे सल्लागार श्री. वसंत सीताराम मुंढे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश/ॲडव्होकेट व कायदे सल्लागार श्री. दिलीप कृष्णा गायकवाड, निवृत्त जिल्हा न्यायाधीश/ॲडव्होकेट यांनी गतवर्षात केलेली उल्लेखनीय कामगीरी लक्षात घेवुन, महामंडळाच्या कायदेविषयक बाबींसाठी त्यांची आवश्यकता असुन, त्यांची करार तत्वावरील नियुक्तीची मुदत दि. ३०/०६/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने त्यांना नियामक मंडळाने निश्चित केलेल्या मानधानानुसार पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यांस नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

ठराव क्र. १०६/२२

"ठराव करण्यात येतो की, मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे यांचा प्रदेश कार्यालयाच्या कामकाजाच्या दृष्टीने श्री. दत्तात्रय न. पोळेकर, शिपाई (नाईक) यांची उपरोक्त पार्श्वभूमी विचारात घेता दि. ०१.०६.२०२१ पासून ११ महिन्याच्या कालावधीसाठी मासिक परिश्रमिक व भत्ते रकमेप्रमाणे करारपध्दतीने नियुक्ती करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०६/२३

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिनियमातील उर्वरित कलमांच्या अनुषंगाने (कलम-७ वगळून) तयार करण्यात आलेले विनियम शासन मान्यतेस्तव सादर करण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची १०६ वी बैठक दिनांक १ जून २०२१

ठराव क्र. १०६/२४

"ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय दि. १७/११/२०१६ अन्वये सिंचन व्यवस्थापन महामंडळाकडे वर्ग केले असून, पाणीपट्टी रक्कम सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे आता सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टीच्या दंडनीय थकबाकीत सवलत व पोकळ आकारणी माफ करणेचे अधिकार महामंडळास मिळणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०६/२५

"ठराव करण्यात येतो की, खडकवासला प्रकल्पांतर्गत नवीन मुठा उजवा कालवा वितरीका क्र.३० ची लघुवितरीका क्र.२ मधील सा.क्र. १९६७ ते ४९७५ मीटर लांबीतील संपादीत क्षेत्र ५.४१ हेक्टर क्षेत्र हे दौंड नगरपरिषद यांना यापुर्वी नियामक मंडळाच्या ८२व्या बैठकीत चालू मुल्यांकनानुसार देण्यास मान्यता दिलेली असल्याने आता नाममात्र भाडेपट्ट्याने देण्याबाबतचा प्रस्ताव कायदे सल्लागारांचे अभिप्राय विचारात घेता सद्य:स्थितीत स्थगित ठेवण्यात येत आहे."

ठराव क्र. १०६/२६

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र राज्यातील वाढत्या औद्योगिकीकरणामुळे दिवसेंदिवस वीजमागणी मध्ये प्रचंड वाढ होत असल्याने महाराष्ट्र राज्य हे अधिकच्या वीज मागणीच्या कालावधीत वीज टंचाईच्या समस्येला तोंड देत आहे. त्यामुळे राज्यातील वाढती विजेची मागणी पूर्ण करण्याकरीता अधिक विद्युतनिर्मिती करणे अपरिहार्य असल्याने व इतर प्रकल्पांमधून निर्माण होणारी वीज Electric Grid मध्ये संतुलित करणे आवश्यक आहे. किमान मागणीच्या काळात ग्रीडमध्ये निर्माण होणाऱ्या वीजेला भार उपलब्ध करून न दिल्यास, औष्णिक वीज निर्मिती केंद्रावरील विद्युत भार कमी करावा लागत असल्यामुळे व अशा प्रकारे विद्युत भार कमी करणे अपेक्षित नसल्याने, विद्युत संचाच्या कार्यक्षमतेवर विपरित परिणाम होत असतात. Electric Grid संतुलनासाठी उदंचन जलविद्युत प्रकल्प एकमेव पर्यावरण पूरक तसेच आर्थिक व तांत्रिकदृष्ट्या योग्य पर्याय असल्याने महाराष्ट्र राज्यातील वरसगांव व कोयना उदंचन जलविद्युत प्रकल्प टप्पा ६ या दोन उदंचन जलविद्युत प्रकल्पांची कामे (B.O.T.) कराराद्वारे करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर E.O.I. ( Expression of Interest ) मागविण्यास नियामक मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची १०६ वी बैठक दिनांक १ जून २०२१

ठराव क्र. १०६/२७

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत कुकडी प्रकल्पाच्या कुकडी डावा कालवा कि.मी. ०० ते ११० पुनर्स्थापना कामाच्या निविदेवरील रु. १८१ लक्ष (भाववाढ वगळून) चे दायित्वास शासनस्तरावरील समितीने कार्योत्तर मान्यता दिलेली असल्याने त्यास खासबाब म्हणून नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. १०६/२८

"ठराव करण्यात येतो की, कर्जरोखे मालिका क्र. IV, V, VI, VII, 99/A, 99/B, 2000/B, 2001/A व 2003/A चे Final Closure करणेसाठी सदर काम Registrars & Transfer Agent मे. मेनन फाइनान्शिएल सर्व्हिसेस लिमिटेड, मुंबई यांचेकडून करणेस व त्यापोटी येणाऱ्या रु. ९०.०० लक्ष व अनुषंगिक खर्चास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

"मान्य"

(इंजि. ता. ना. मुंडे)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

(जयंत राजाराम पाटील)
मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे